ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

## एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम (२०२१–२०२३) (M62)

## माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2021–2022**

# शिक्षणशास्त्र विद्याशाखा : एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम (M62): माहितीपुस्तिका

*अनुक्रमणिका*


**१. विद्याशाखेचा परिचय** ........ **३**

**२. एम. ए. (शिक्षणशास्त्र) (M62) शिक्षणक्रमाविषयी** ........ **३**

**३. प्रवेश–प्रक्रिया** ........ **४**

**४. शिक्षणक्रमाची संरचना/आकृतिबंध** ........ **४**

**५. मूल्यमापन प्रक्रिया** ........ **५**

**६. संकीर्ण माहिती/सूचना** ........ **६**

**७. अभ्यासकेंद्रे** ........ **८**

**८. विभागीय केंद्रे** ........ **११**

**९. परिशिष्टे – एम. ए. (शिक्षणशास्त्र) एम.एड. ला समकक्षतेबाबत** ........ **१२**



## निर्मिती

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२



© २०२१ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



- **प्रथम प्रकाशन** : मे २०२१
- **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB-21-22-20**

# १. विद्याशाखेचा परिचय

या विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात शिक्षणशास्त्र विद्याशाखेची स्थापना झाली. त्यानंतर शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपले नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. आज संपूर्ण महाराष्ट्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे नेतृत्वाच्या दृष्टीने पाहतो. अद्ययावतता, गतिमानता आणि नवोपक्रमांचे स्वागत ही या विद्याशाखेची वैशिष्ट्ये.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपल्या कार्यास सुनिश्चितरित्या आणि गुणवत्ता राहावी या दृष्टीने विद्याशाखेचे गुणवत्ता धोरण, व्रतविधान आणि उद्दिष्टे निश्चित केली. त्या अनुषंगाने विद्याशाखेत प्रमाणपत्रापासून संशोधनापर्यंत अनेक शिक्षणक्रम टप्प्या-टप्प्याने सुरू झाले. विद्याशाखेच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात (१९९१) दूरशिक्षणाद्वारे बी. एड. शिक्षणक्रम सुरू करणारे संपूर्ण भारतातील हे पहिले मुक्त विद्यापीठ होय. त्यानंतर ह्या विद्याशाखेने अवघ्या दहा-पंधरा वर्षांत एम. फिल. शिक्षणशास्त्र (२००७), एम. फिल. शारीरिक शिक्षण (२००७), एम. एड. (१९९४), एम. ए. शिक्षणशास्त्र (२००७) असे उच्च पदवी शिक्षणक्रम सुरू केले. एवढेच नव्हे तर विद्यापीठाच्या ध्येयास सुसंगत असे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणारे स्वयं-साहाय्य गट बांधणी (२००२), बालसेविका (२००२), ई. बी. एड. (२००९), यांसारखे प्रमाणपत्र शिक्षणक्रमही कार्यान्वित केले. शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी मुख्याध्यापकांसाठी शालेय व्यवस्थापन पदविका तर माध्यमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन केले. 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहचवण्याच्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात अभ्यासकेंद्रे स्थापन केली.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची असते, तर ह्या विद्याशाखेत प्रवेश घेणारे विद्यार्थी सेवांतर्गत असतात. ह्याचा विचार करून शिक्षणक्रमांची व त्यातील प्रात्यक्षिकांची रचना केली. प्रत्येक प्राप्त अनुभव वास्तविक स्तरावर पडताळून पाहता यावा यासाठी विशेष प्रात्यक्षिकांचे नियोजन केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व तज्ज्ञांच्या मदतीने मुद्रित-अमुद्रित साहित्य तयार केले. ह्या विद्याशाखेतील शिक्षणक्रम व्यावसायिक असतात. त्याचा विचार करता अभ्यासकेंद्रांवर शिक्षणक्रमातील विशिष्ट प्रात्यक्षिके मार्गदर्शनाखालीच करता यावी, त्याचा सराव व्हावा या दृष्टीने संपर्कसत्रांचे आयोजन केले.

मुक्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखा अनेकविध पुरस्कारांनी विभूषित आहे हे सांगण्यास आम्हाला आनंद होतो. आंतरराष्ट्रीय पुरस्कारात डॉ. अनंत जोशी, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना COL कडून मिळालेला जीवनगौरव पुरस्कार, श्रीमती वानखेडे स्वाती, बी. एड., एम. एड. ची विद्यार्थिनी ह्यांना COL कडून मिळालेला Award of Excellence for D.E. ह्यांचा समावेश होतो. तसेच येथील प्राध्यापक वर्गासही राष्ट्रीय व राज्य पातळीवरील वैयक्तिक पुरस्कार मिळालेले आहेत.

# २. एम. ए. (शिक्षणशास्त्र) (M62) शिक्षणक्रमाविषयी

शिक्षणशास्त्र हे सामाजिकशास्त्र आहे. या शास्त्रातही पदव्युत्तर पदवी एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम असावा म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने सन २००१ साली त्याचा अभ्यासक्रम आकृतिबंध (Curriculum) प्रसिद्ध केला व त्यात एम.ए. शिक्षणशास्त्र यास पदव्युत्तर पदवीचा विषय म्हणून मान्यता दिलेली आहे.

एम.ए. शिक्षणशास्त्र निष्णात शिक्षणक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षणातील विविध घटकांचा अभ्यास करावा असे अपेक्षित आहे. विविध पातळींवरील सेवांतर्गत प्रशिक्षण, धोरण विकसन, चिकित्सा, शिक्षण प्रणालीचे मूल्यमापन यासाठी निष्णात व्यक्तींची आवश्यकता आहे. काळानुरुप शिक्षण प्रक्रियेत होत गेलेले बदल अभ्यासणे गरजेचे आहे. शिक्षणशास्त्र ही विद्याशाखा आंतरज्ञानशाखीय (Multi-disciplinary) आहे. त्यामुळे तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, व्यवस्थापनशास्त्र अशा अनेकविध विद्याशाखांमधून विविध तत्त्व, प्रणाली शिक्षणास मिळालेल्या आहे. या सर्वांचा अभ्यास एम.ए. शिक्षणशास्त्र निष्णात व्यक्तींनी करणे गरजेचे आहे.

शिवाजी विद्यापीठात पदवी पातळीवर बी.ए. शिक्षणशास्त्र राबविण्यात येत आहे. तर ओरिसा, आसाम आणि मुंबई विद्यापीठानेही एम.ए. शिक्षणशास्त्र हा शिक्षणक्रम सुरू केलेला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचविलेल्या एम.ए. शिक्षणशास्त्र ह्या पदवीची दखल नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (एन.सी.टी.ई.) या संस्थेनेही घेतलेली असून डी.एड./बी.एड. महाविद्यालयात शिकविण्यासाठी एम.एड./एम.ए.शिक्षणशास्त्रास मान्यता दिलेली आहे. (नियम क्र. २९/११/१९९५, (Annex-A) संपूर्ण महाराष्ट्रातील विविध स्तरांवरील कार्यरत शिक्षकांना दैनंदिन कार्याशी निगडित पदव्युत्तर पदवी घेण्याच्या दृष्टीने मुक्त विद्यापीठाने उचललेले हे एक नवे पाऊल आहे.

## २.१ उद्दिष्टे

- पाश्चात्त्य आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा शिक्षणक्षेत्रातील सहभाग स्पष्ट करणे.
- सामाजिक बदलाचा शिक्षणातील सहभागावर झालेला परिणाम स्पष्ट करणे.
- मानसशास्त्रातील विविध शाखांमधून शिक्षणशास्त्र कसे विकसित झाले ह्याचे आकलन वृद्धिंगत करणे.
- शैक्षणिक मानसशास्त्र, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, शिक्षणाचे समाजशास्त्र, मूल्यमापन, इत्यादी क्षेत्रांतील ज्ञानपातळी उंचावण्यास मदत करणे.
- शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक ते ज्ञान, दृष्टी, कौशल्ये विकसित करणे.
- शैक्षणिक नियोजन, प्रशासन, निरंतर व अनौपचारिक शिक्षण, शैक्षणिक तंत्रविज्ञान, प्रौढ शिक्षण या क्षेत्रांसाठी आवश्यक ते मनुष्यबळ निर्माण करणे.

# ३. प्रवेश–प्रक्रिया

### ३.१ प्रवेश–पात्रता

(१) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची **शिक्षणशास्त्र** विषयातील बी.ए. पदवी उत्तीर्ण

***किंवा***

(२) यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या पदवीच्या किमान द्वितीय वर्षापर्यंत शिक्षणशास्त्र विषय घेतलेले

***किंवा***

(३) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.) उत्तीर्ण झालेले उमेदवार.

***किंवा***

(४) बी.ए. बी.एड. (एकात्मिक) उत्तीर्ण किंवा बी.एस्सी. बी.एड. (एकात्मिक) उत्तीर्ण.

***किंवा***

(५) बी.एड. (विशेष शिक्षण) उत्तीर्ण.

***किंवा***

(६) बी.पीएड. पदवी उत्तीर्ण.

***किंवा***

(७) बी.एड. शारीरिक शिक्षण उत्तीर्ण.

वरील सर्व पात्रतेसाठी **खुल्या वर्गासाठी ५५%** आणि **मागासवर्गासाठी ५०% गुण** आवश्यक आहेत.

### ३.२ एकूण जागा

प्रत्येक अभ्यासकेंद्रावर २५ जागा आहेत. प्रथम प्रवेश घेणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

### ३.३ शिक्षणक्रमाची संरचना

| | | |
|---|---|---|
| (अ) अभ्यास विषय | : | १६ सैद्धान्तिक विषय ६४ श्रेयांक |
| (आ) श्रेयांकाधारित | : | (२) विषय ०८ श्रेयांक |
| (इ) संशोधन | : | ०६ श्रेयांक |
| (ई) एकूण श्रेयांक | : | ७८ |
| (उ) किमान कालावधी | : | २४ महिने |
| (ऊ) एकूण अध्ययन तास | : | २७३० घड्याळी तास (अंदाजे) |

ह्या शिक्षणक्रमाचा कालावधी २ वर्षांचा असला तरी विद्यार्थी त्याच्या सोईप्रमाणे प्रवेश घेतल्यापासून ४ वर्षांत हा शिक्षणक्रम पूर्ण करू शकेल. ह्या कालावधीत शिक्षणक्रम पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी पुन्हा चार वर्षांसाठी ज्या वर्षी नोंदणी कालावधी संपतो त्या वर्षाच्या तुकडीचे संपूर्ण शुल्क भरून पुनर्नोंदणी करण्याची संधी देण्यात येते.

### ३.४ शिक्षणक्रम शुल्क

एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठीचे शुल्क पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| विद्यापीठ शुल्क (दोन्ही वर्षांचे मिळून) | रु. ११,२००/– |
| अभ्यासकेंद्र शुल्क (दोन्ही वर्षांचे मिळून) | रु. ६,८७५/– |
| **एकूण शिक्षणक्रम शुल्क** | **रु. १८,०७५/–** |

विद्यार्थ्यांचा प्रवेश हा प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाला होणार आहे. त्यामुळे दोन वर्षाचे शुल्क स्वतंत्रपणे भरावयाचे आहे. दोन वर्षाच्या विद्यापीठ शुल्काची विभागणी पुढे देण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष | रु. ५,६५०/– |
| द्वितीय वर्ष | रु. ५,५५०/– |

(१) विद्यापीठ प्रथम वर्षाचे ५,६५०/– शुल्क हे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. द्वितीय वर्षासाठी विद्यापीठ शुल्क ५,५५०/– ऑनलाईन पद्धतीनेच दुसऱ्या वर्षी भरावयाचे आहे.

(२) अभ्यासकेंद्रावर प्रथम वर्षासाठी ३४३८/– एवढे शुल्क भरावयाचे आहे, तर दुसऱ्या वर्षीच्या प्रवेशानंतर ३४३८/– शुल्क अभ्यासकेंद्रावर भरावयाचे आहे.

(३) दुसऱ्या वर्षाच्या प्रवेशासाठी विद्यापीठाच्या वेबसाईटवर online Register Student Admission लिंकवर जाऊन प्रवेश घ्यावा. त्यासाठी तुमचा PRN व PASSWORD टाकावा. PASSWORD हा yymmdd ह्या format प्रमाणे भरावा. उदा. तुमची जन्मतारीख १५/०२/१९७५ असेल तर ७५०२१५ हा तुमचा PASSWORD असेल.

(४) अभ्यासकेंद्रावर वरील निर्धारित शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारल्यास देऊ नये. अशा प्रकारची शुल्काची मागणी केल्यास तातडीने विद्यापीठाकडे लेखी संपर्क साधावा.

### ३.५ कालावधी

एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाची किमान कालमर्यादा चोवीस महिन्यांची आहे. मूळ शुल्कामध्येच जास्तीत जास्त चार वर्षे नोंदणी राहू शकेल. या कालावधीत विद्यार्थ्याला अंतिम परीक्षेसाठी १ + ८ संधी उपलब्ध होतील. चार वर्षांनंतर नोंदणी आपोआप रद्द होईल. चार वर्षांनंतर विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्याला पुन्हा नोंदणी करता येईल. त्याची मुदत चार वर्षांची असेल. **पुनर्नोंदणी शुल्क म्हणून (ज्या वर्षी नोंदणी कालावधी संपतो) त्या वर्षाच्या मुक्त विद्यापीठाच्या नियमित एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमासाठी असलेले शुल्क भरावे लागेल किंवा विद्यापीठाने निर्धारित केलेले शुल्क भरावे लागेल.**

### ३.६ माध्यम

या शिक्षणक्रमासाठी पुरविण्यात येणारे सर्व अध्ययन–साहित्य मराठी माध्यमातून असेल. मात्र उत्तरे लिहिण्यासाठी पूर्वपरवानगीने हिंदी वा इंग्रजी यांपैकी एका माध्यमाचा वापर करता येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मात्र मराठी व इंग्रजीतच उपलब्ध होतील. त्यातील मराठी प्रश्नपत्रिका कायद्यानुसार वैध मानण्यात येतील.

# ४. शिक्षणक्रमाची संरचना/आकृतिबंध

या शिक्षणक्रमाचे (१) अनिवार्य अभ्यासक्रम, (२) श्रेयांकाधारित अभ्यासक्रम, (३) वैकल्पिक अभ्यासक्रम व (४) संशोधन कार्य असे चार भाग पडतात.

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | संकेतांक |
|---|---|---|
| | **प्रथम सत्र (अनिवार्य विषय)** | |
| १. | शिक्षणाचे तात्त्विक यथार्थदर्शन | EDU-521 |
| २. | शिक्षणाचे सामाजिक व सास्कृतिक यथार्थदर्शन | EDU-522 |
| ३. | संशोधन पद्धती | EDU-523 |
| ४. | सांख्यिकी तंत्राचे उपयोजन | EDU-524 |
| | **द्वितीय सत्र (अनिवार्य विषय)** | |
| १. | शिक्षणाचे मानसशास्त्रीय यथार्थदर्शन | EDU-525 |
| २. | व्यक्तिमत्वातील मानसशास्त्रीय यथार्थदर्शन | EDU-526 |
| ३. | अनुदेशन प्रणाली अभिकल्प | EDU-527 |
| ४. | दूरशिक्षणातील अनुदेशन अभिकल्प | EDU-528 |
| | **श्रेयांकाधारित श्रेणी प्रणाली अभ्यासक्रम (कोणताही एक)** | |
| १. | सायबर सिक्युरिटी | GEN-121 |
| २. | इंग्रजी | GEN-101 |
| ३. | फ्रेंच | GEN-103 |
| ४. | अरेबिक | GEN-104 |
| ५. | जर्मन | GEN-105 |
| ६. | ऑफिस टूल (इंग्रजी माध्यम) | GEN-122 |
| ७. | संवाद कौशल्ये (मराठी माध्यम) | MAR-549 |
| ८. | कम्युनिकेशन स्कील्स (इंग्रजी माध्यम) | GEN-204 |
| | **तृतीय सत्र (अनिवार्य विषय)** | |
| १. | शिक्षणातील मूल्यनिर्धारण | EDU-531 |
| २. | शिक्षणातील मूल्यमापन | EDU-532 |
| ३. | शिक्षणातील संज्ञापन मार्ग | EDU-533 |
| ४. | दूर शिक्षणातील संज्ञापन मार्ग | EDU-534 |
| | **चतुर्थ सत्र *(वैकल्पिक अभ्यासक्रम – कोणतेही दोन)*** | |
| १. | शैक्षणिक व्यवस्थापन | EDU-535 |
| २. | शैक्षणिक प्रशासन | EDU-536 |
| | ***किंवा*** | |
| १. | शैक्षणिक नियोजन भाग – १ | EDU-537 |
| २. | शैक्षणिक नियोजन भाग – २ | EDU-538 |
| | ***किंवा*** | |
| १. | प्रौढ शिक्षण | EDU-539 |
| २. | निरंतर शिक्षण | EDU-540 |
| | ***किंवा*** | |
| १. | अनौपचारिक शिक्षण | EDU-541 |
| २. | अनौपचारिक शिक्षणाची भमिका | EDU-542 |
| | **श्रेयांकाधारित श्रेणी प्रणाली अभ्यासक्रम (कोणताही एक)** | |
| १. | मूल्यशिक्षण (मराठी माध्यम) | GEN-203 |
| २. | योगशिक्षण (मराठी माध्यम) | GEN-401 |

### ४.१ श्रेयांकाधारित अध्ययन साहित्य

द्वितीय सत्र आणि चतुर्थ सत्रातील श्रेयांकाधारित अध्ययन साहित्य हे ह्या वर्षापासून छापले जाणार नाहीत. सर्व अध्ययन साहित्य हे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर softcopyद्वारा e_Bookमध्ये देण्यात येणार आहे. त्यामुळे अध्ययनसाहित्यात श्रेयांकाधारित अध्ययन साहित्याची पुस्तके उपलब्ध होणार नाहीत.

Online e_Bookसाठी : विद्यापीठाच्या वेबसाईटवर जाऊन होमपेजवर e_Bookवर क्लीक केल्यावर पुस्तकांच्या Code क्रमांकानुसार अध्ययनसाहित्य पाहावे.

## ५. मूल्यमापन प्रक्रिया

(१) विद्यार्थ्याचे मूल्यमापन दोन प्रकारे करण्यात येईल.
(अ) अंतर्गत (निरंतर) मूल्यमापन
(आ) अंतिम परीक्षा –
(१) लेखी परीक्षा, लघू शोधप्रबंध
(२) मौखिक परीक्षा

**(अ) अंतर्गत मूल्यमापन**

अंतर्गत मूल्यमापनात स्वाध्याय असतील. प्रत्येक विद्यार्थ्याला सर्व अभ्यासक्रमांवर आधारित प्रत्येकी एक याप्रमाणे सखोल अभ्यास करून एकूण १७ (सतरा) स्वाध्याय सादर करावे लागतील. 'संशोधन पद्धती' ह्या अभ्यासक्रमासाठी स्वाध्याय हा 'संशोधन आराखडा' सादरीकरण असेल. हे सादरीकरण अभ्यासकेंद्रावर घेण्यात येईल व त्याचे मूल्यमापन हे परिसंवाद/कृतिसत्रात अभ्यासकेंद्रावरील संमंत्रक करतील व २० पैकी गुण देतील. परंतु विद्यार्थ्यांना 'संशोधन आराखडा' विद्यापीठाच्या वेबवर अपलोड करावा लागेल. अभ्यासकेंद्रावरील अंतर्गत गुणांमध्ये २० पैकी गुण केंद्रसमन्वयकाने विद्यापीठाकडे कळविणे आवश्यक आहे.

**(आ)लेखी परीक्षा**

लेखी परीक्षा ही सत्र पद्धतीने (सेमिस्टर) घेण्यात येईल. त्यामुळे वर्षातून २ वेळा म्हणजेच २ वर्षातून ४ वेळा दर सहा महिन्यांनी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

लेखी परीक्षेसाठी ८० गुणांची परीक्षा असेल. प्रश्नपत्रिकेत एकूण ४ प्रश्नांपैकी प्रत्येक प्रश्नात ५ उपप्रश्न असतील. त्यापैकी कोणतेही ४ उपप्रश्न सोडवावे लागतील. याप्रमाणे एकूण ४ प्रश्नांचे एकूण २० उपप्रश्न त्यापैकी १६ प्रश्न विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेत सोडवावे लागतील.

**श्रेयांकाधारित श्रेणीप्रणाली अभ्यासक्रमाची (१) संप्रेषण कौशल्ये, (२) ऑफिस टूल ह्या विषयांची लेखी परीक्षा इंग्रजी माध्यमातून असेल. परीक्षा दरवर्षी नोव्हेंबर/डिसेंबर आणि मे / जून या महिन्यांमध्ये होईल. परीक्षा अर्ज परीक्षेपूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. त्याबाबतची सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर असेल.**

(इ) एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाल्यास त्या विषयाच्या पुनर्परीक्षेसाठी किंवा संशोधन अहवाल अपूर्ण असल्यास Online Repeaterचा अर्ज भरावा व विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या शुल्काप्रमाणे शुल्क भरावे.

(ई) विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षेविषयीची सर्व माहिती, सूचना, परीपत्रके ही 'Examination' ह्या वर जाऊन वेळोवेळी पाहाव्यात.

**लघूशोधनिबंध परीक्षा :**

(१) अभ्यासकेंद्रावर लघुशोधनिबंध जमा करण्याची संधी वर्षातून दोनदा असते. (मार्च / ऑगस्ट) लघुशोधनिबंधाचे अहवालाचे मूल्यमापन व मौखिक परीक्षा अभ्यासकेंद्रावरच घेण्यात येते. ही परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते.

(२) अंतिम परीक्षेची गुण विभागणी खालीलप्रमाणे असते.

अंतिम परीक्षा एकूण ८० गुणांची असेल. सर्व अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका मराठीत आणि इंग्रजीत राहतील. ह्या शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असल्याने ज्यांना उत्तरे अथवा लघुशोधप्रबंध इंग्रजीतून किंवा हिन्दीतून लिहावयाचे असतील त्यांना तशी पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.

(३) उत्तरपत्रिकांची तपासणी केंद्रीय पद्धतीने संबंधित अभ्यासक्रमांच्या तज्ज्ञ प्राध्यापकांच्या साहाय्याने केली जाईल.

(४) लघू शोधप्रबंधाचे परीक्षण दोन परीक्षक करतील (एक बहिःस्थ परीक्षक व एक अंतर्गत परीक्षक). लेखी अहवाल मूल्यमापना-व्यतिरिक्त मौखिक परीक्षाही असेल.

(५) शिक्षणक्रमाचे मूल्यमापन

(अ) सैद्धान्तिक अभ्यासक्रम : १८०० गुण
(८०% अंतिम परीक्षा + २०% अंतर्गत मूल्यमापन)

(आ) लघू शोधप्रबंध, मूल्यमापन व मौखिक परीक्षा असेल.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दोन प्रकारे केले जाईल.

**(अ) अंतर्गत मूल्यमापन**

(१) अनिवार्य अभ्यासक्रम – स्वाध्याय (फक्त लेखी)

(२) संशोधन पद्धती १ दीर्घ स्वाध्याय – संशोधन आराखडा (सादरीकरण)

श्रेयांक आधारित श्रेणी प्रणालीचे अभ्यासक्रमाचे मूल्यमापन अंतर्गत (स्वाध्याय) आणि लेखी अंतिम परीक्षा बहिर्गत मूल्यमापनासाठी असेल.

**उत्तीर्णतेचे नियम**

(१) प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतिम लेखी परीक्षा व स्वाध्याय यामध्ये प्रत्येकी किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(२) लघू शोधप्रबंध उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे. तसेच मौखिक परीक्षेत ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(३) संपूर्ण शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी किमान ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(४) श्रेयांकाधारित अभ्यासक्रमांसाठी मूल्यमापनात Grading (श्रेणी) दिली जाईल. परंतु एकत्रित निकालात ती धरली जाणार नाही.

**परिशीलन समिती (Revaluation Committee) :** सर्व एम.ए. शिक्षणशास्त्र अभ्यासकेंद्रांवर संशोधन अहवाल मूल्यमापन व मौखिक परीक्षा झाल्यानंतर सर्व अहवालांचे विद्यापीठात एकत्रितरित्या परिशीलन समितीकडून परिशीलन केले जाते. त्यानंतर विद्यार्थ्यांचा अंतिम निकाल जाहीर केला जाईल. परिशीलन समितीची बैठक ही वर्षातून दोनदाच आयोजित केली जाते.

मूल्यमापनाबाबतची सविस्तर माहिती तुम्हाला अभ्यासकेंद्रावर मिळेल.

**अंतिम परीक्षेसाठी पात्रतेच्या अटी**

(१) शिक्षणक्रमाच्या सर्व संपर्कसत्रांना उपस्थित राहून सर्व प्रात्यक्षिक कार्ये- दीर्घ स्वाध्याय – लघू स्वाध्याय पूर्ण केल्याबद्दलचे अभ्यासकेंद्र-प्रमुखांचे प्रमाणपत्र विद्यार्थ्याने घेतले पाहिजे.

(२) प्रथम संपर्कसत्रास अनुपस्थित राहिल्यास संपर्कसत्राच्या प्रत्येक दिवसाच्या अनुपस्थितीचा रु. २००/- प्रमाणे अतिरिक्त शुल्क भरल्याशिवाय व ते सत्र पूर्ण केल्याशिवाय अंतिम परीक्षेस बसता येणार नाही. प्रत्येक दिवसाच्या रु. २००/- रकमेनुसार, एकूण शुल्कापैकी विद्यापीठ शुल्क विद्यापीठाने निर्धारित केलेल्या बँकेत ऑनलाईन भरावे व संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्याकडे अनुपस्थितीची माहिती कळवावी. (अभ्यासकेंद्र शुल्क ४०% व विद्यापीठ शुल्क ६०% विभागणी केलेली आहे.)

(३) प्रत्येक सत्रातील (Semester) संपर्कसत्रांत ८०% उपस्थिती अनिवार्य आहे.

## ६. संकीर्ण माहिती/सूचना

एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानंतर खालील विशेष बाबी लक्षात ठेवाव्यात.

१. **एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही वा या संदर्भातील पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तथापि, शिक्षणक्रम सुरू असताना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याचे निधन झाल्यास त्यापुढील आवश्यक कागदपत्रांची त्याच्या वारसाने पूर्तता केल्यास प्रशासकीय खर्च वजा करून ७५% शुल्क परत करण्यात येईल. शुल्क परत करताना (१) मृत्यूच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत (२) रु. २० च्या स्टँपपेपरवर कार्यकारी दंडाधिकारी यांच्या समक्ष प्रमाणित केलेले वारसाचे ना हरकत दर्शविणारे मूळ शपथपत्र (३) शुल्क भरल्याची मूळ पावती (४) अध्ययन साहित्य. विद्यापीठास सादर करावे लागेल.**

२. विद्यापीठास पत्र पाठविताना कायम नोंदणी क्रमांक व तुकडीचा, अभ्यास-केंद्राचे नाव व संकेतांक यांचा उल्लेख नमूद करणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यास विद्यापीठाने माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या अटी व शर्ती प्रवेशासाठी लागू राहतीलच, परंतु या व्यतिरिक्त विद्यापीठाने वेळोवेळी तयार केलेले नियमही बंधनकारक राहतील.

### संपर्कसत्रे उपस्थिती माहिती

मुक्त विद्यापीठाचा शिक्षणक्रम प्राधान्याने स्वयं-अध्ययनावर आधारित असला तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे संमंत्रण, स्वाध्याय सादरीकरण, संशोधन मार्गदर्शन, कृतिसत्रे आणि परिसंवाद, इत्यादींसाठी संपर्कसत्रांची आवश्यकता असते. संपर्कसत्रातील उपस्थिती व सहभाग हा अत्यावश्यक व अनिवार्य आहे. संपर्कसत्रांचे आयोजन सामान्यतः सुट्यांमध्ये केले जाते. सुट्यांव्यतिरिक्त छोट्या संपर्कसत्रांचे

आयोजन अभ्यासकेंद्राने केल्यास अशा संपर्कसत्रांसाठी विद्यार्थ्यांना सेवेतून रजा घेऊन उपस्थित राहावेच लागेल. त्याबद्दल कोणतीही तक्रार विद्यापीठ मान्य करणार नाही.

दोन वर्षांत एकूण ३० दिवसांचे संपर्कसत्र घेण्यात येईल. त्यातील २ दिवसांचे उद्‌बोधन सत्र व उर्वरित २८ दिवसांचे संपर्कसत्र अभ्यास–केंद्रावर घेण्यात येईल. संपर्कसत्राबाबतचा सविस्तर तपशील अभ्यास–केंद्रामार्फत देण्यात येईल. विद्यार्थी मार्गदर्शिकेतही देण्यात येईल.

## सेवानिहाय शुल्क

सेवानिहाय शुल्कविद्यापीठाच्या नवीन धोरणानुसार सेवानिहाय शुल्क आकारणी झालेली आहे. परीक्षा, गुणपत्रक, उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन यांसारख्या बाबींचा त्यात समावेश आहे. सदर शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | सेवेचा प्रकार | सुधारित शुल्क टपाल खर्चासह |
|---|---|---|
| १. | स्थलांतरित दाखला (Migration Certificate) | ४०० |
| २. | डुप्लिकेट गुणपत्रक (Duplicate Statemnt of Marks) | २०० |
| ३. | डुप्लिकेट दीक्षान्त प्रमाणपत्र (Duplicate Convocation Certificate) | ४०० |
| ४. | छायाप्रत / स्कॅन प्रत फक्त / उत्तर पत्रिकेची स्कॅन प्रत ई–मेलद्वारे (Photocopy/Scan copy of Answer sheets per copy by e-Mail only) | ३०० |
| ५. | प्रति विषयाच्या उत्तर पत्रिकांचे पुनर्मूल्यांकन (Revaluation of Answer Book per Subject) | ५०० |
| ६. | उतारा प्रमाणपत्र (Transcript Certificate)<br>(अ) प्रथम प्रत भारतांतर्गत (First copy Delivery in India) | १,८५० |
| | (आ) भारताबाहेरील (For outside India) | २,८०० |
| | (इ) प्रत्येक अतिरिक्त प्रतीसाठी (For every additional copy) | ४०० |
| ७. | मार्कशीटचे प्रमाणन (Attestation of Marksheet) | ४०० |
| ८. | शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी (Verification of Educational documents) | ४०० |
| ९. | पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षा शुल्क (डिप्लोमा/युजी) (Repeater student exam. fees Dipl./UG) | १३० प्रति विषय |
| १०. | विद्यार्थी परीक्षा शुल्क पीजी/टेक/ व्यावसायिक (Repeater student Exam Fees PG/Tech,/Professional) | १५० प्रति विषय |
| ११. | पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे गुणपत्रक (Repeater student Statement of Marks) | १०० प्रति मार्कशीट |

## संपर्कासाठी पत्ते

(१) **माहितीपुस्तिका :**
विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करावी.
http://ycmou.digitaluniversity.ac

(२) **अभ्यासक्रमातील शैक्षणिक अडचणी**
डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
फोन : (०२५३) २२३१७१४/१५, २२३१४७२

(३) **शिक्षणक्रम विकसन समन्वयक**
डॉ. विजया विनायक पाटील
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, १५ विस्तार : ३००४
***E-mail : patilvijaya313@gmail.com***

(४) **नोंदणी कक्ष**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३०११८/२२३०७३४

(५) **पुस्तके, अध्ययन–साहित्य बाबत**
सौ. मीना वाडिले
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३०१०७

(६) **परीक्षा अर्ज, परीक्षा क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्राबाबत**
उपकुलसचिव, परीक्षा कक्ष–१
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३०७१६

**महत्त्वाचे :** विद्यापीठाशी करावयाचा सर्व पत्रव्यवहार पोस्टाने अथवा स्पीड पोस्टानेच करावा. खाजगी कुरीअरमार्फत करू नये. शक्यतो आपल्या अडचणी ह्या अभ्यासकेंद्रावरील केंद्र–समन्वयकांशी चर्चा करून सोडवाव्यात. केंद्रसमन्वयकाने आवश्यकता वाटल्यास शिक्षणक्रम समन्वयकाकडे संपर्क साधावा.

तुम्हाला येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी आवश्यक माहिती व मदत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ‘Presentation’ ह्या पेजला भेट द्या. http://ycmou.digitaluniversity.ac/content.aspx?ID=26784 ह्या वेबसाईटवर सतत संपर्कात राहा.

# ७. अभ्यासकेंद्रे

| अ.क्र. | जिल्हा (District) | अभ्यासकेंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता (Stydy Center Name & Address) | दूरध्वनी क्रमांक (Telephone No.) |
|---|---|---|---|---|
| **अमरावती** | | | | |
| 1 | बुलढाणा | 1302A | शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा | 9423625508<br>9987089507 |
| 2 | अकोला | 1171A | कर्मयोगी बाबासाहेब अपोतीकर अध्यापक व अनुसंधान महाविद्यालय, आपोती खु.ता. अकोला जि. अकोला-444003 | 9850029594<br>9922280289 |
| 3 | अमरावती | 12128 | रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालय, उत्तमनगर अमरावती | 9423609977<br>9822682633 |
| 4 | वाशिम | 1522A | श्री बालाजी अध्यापक महाविद्यालय गट क्र. 162 जांभरुण (पराडे) अकोला रोड वाशिम ता.जि. वाशिम | 9763202495<br>9325363728 |
| 5 | यवतमाळ | 1410A | गुणवंतराव देशमुख शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुसद जि.यवतमाळ 445215 | 8625033916<br>9834363098<br>9604588135 |
| 6 | अकोला | 11122,<br>11118 | नर्मदाबाई बोडखे अध्यापक महाविद्यालय तेल्हारा, गो.खे. कॉलेज जवळ गाडेगाव,शेगाव रोड, तेल्हारा,जिल्हा. अकोला 444108. | 8007634041<br>9975716559 |
| 7 | अमरावती | 12235 | केशराबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन अचलापूर,गोवर्धन विहार वार्ड नं-2 कांडली परतवाडा, मेनरोड कांडली - 444805 | 7057536807<br>8605952024 |
| 8 | बुलढाणा | 13157 | विदर्भ युवक विकास संस्थेचे म.गांधी अध्यापक महाविद्यालय बुलढाणा, बेहिंद तार कॉलनी जवळ बोरा रोड, सुंदरखेड बुलढाणा - 443001 | 9423722415<br>7242946490 |
| 9 | बुलढाणा | 13156 | अभिनव कॉलेज ऑफ एज्युकेशन बी.एड. चिखली बुलढाणा , डी.पी.रोड पारधी बाबा मंदिर जवळ चिखली जि- बुलढाणा - 443201 | 9623004066<br>9422920433 |
| 10 | बुलढाणा | 13147 | मातोश्री सायाराबाई चंपालालजी चोपडा बी.एड.कॉलेज खामगाव, टँक रोड, कॉटन मार्केट, बेलापूर फेल जि- बुलढाणा 444303 | 9881215959<br>9850315953 |
| **औरंगाबाद** | | | | |
| 1 | औरंगाबाद | 2194A | मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, पो.बॉक्स 130117 रोजाबाग, औरंगाबाद- 439009 | 9325203121<br>(0240) 23811096,<br>2390771 |
| 2 | जालना | 2321A | वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, छत्रपती कॉलनी, जुना जालना | (02482) 221250<br>9421648320 |
| 3 | उस्मानाबाद | 2601A | श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज आफ एज्युकेशन, आर. पी. कॉलेज कॅम्पस, तांबरी विभाग, उस्मानाबाद ता. जि. उस्मानाबाद | 9822623080<br>9881822453<br>02472-222058 |
| **मुंबई** | | | | |
| 1 | ठाणे | 35284 | ज्ञानगंगा एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ एज्युकेशन डी -मार्टच्या शेजारी कासारवडवली नका जी.बी. रोड, ठाणे (प.) 400615 | (022) 25973187<br>8828391396 |
| 2 | पालघर | 35291 | लक्ष्मी रतन शाह बी.एड. कॉलेज, चिंचघर पो. कुडूस ता.वाडा जि- पालघर चिंचघर रोड-421312 | 9975235464<br>9975784476 |
| 3 | मुंबई | 3186A | पी व्ही डी टी कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन, एस एन डी टी महिला विद्यापीठ,* एन टी रोड, न्यू मारिन लाईन, चर्चगेट, मुंबई-20 | 7021324397<br>8692887894 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **नागपूर** | | | | |
| 1 | गोंदिया | 4104A | पूंजाबाई पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, डॉ आंबेडकर वॉर्ड, गोंदिया 441601 | 9421896516<br>9823025074 |
| 2 | चंद्रपूर | 4220A | जनता कॉलेज ऑफ एज्युकेशन सिव्हील लाईन चंद्रपूर जि-चंद्रपूर 440025 | 9822470524<br>9850777530 |
| **नाशिक** | | | | |
| 1 | जळगाव | 5310A | के सी ई सो शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,जळगाव | (0257) 2234187<br>9422224612<br>9823564970 |
| 2 | अहमदनगर | ५१०७A | रयत शिक्षण संस्थेचे, स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, रयत शैक्षणिक संकुल, वार्ड क्रमांक १, श्रीरामपूर | 02422-222487<br>9850526235<br>9765196557 |
| 3 | नंदूरबार | 5527A | जिजामाता कॉम्पेक्स शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वाघोदा रोड, नंदूरबार-425412 | (02564) 230169<br>9822324441<br>9049694128 |
| 4 | धुळे | 5283A | श्रीमती मनकर्णाबाई विनायकराव मराठे महिला शिक्षण-शास्त्र महाविद्यालय पिंपळनेर ता साक्री जि धुळे 424306 | 8329868878<br>9922548570 |
| 5 | धुळे | 5272A | अभय युवा कल्याण केंद्र संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय , धुळे | 9422792559<br>8999048147 |
| 6 | नाशिक | 5401A | मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक | 9422761284<br>8855999252 |
| 7 | नाशिक | 54451 | डॉ.डी.एस.आहेर शिक्षणशास्त्र महाविद्यालय लोहानेर ता. देवळा जि-नाशिक | 8421128771<br>9822769848 |
| **पुणे** | | | | |
| 1 | सोलापूर | 6507A | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,सोलापूर | 7875669859<br>(0217) 2651705<br>9860186037 |
| 2 | सोलापूर | 65131 | कॉलेज ऑफ एजुकेशन,बार्शी जिल्हा. सोलापूर-413411 | 0284 222569<br>9850368385<br>9503637817<br>9890627179 |
| 3 | पुणे | 62422 | एम.आय. टी. बी एड. कॉलेज, देहू फाटा आळंदी देवाची, पुणे 412105 | 9850239630<br>9881566257 |
| 4 | पुणे | 5253A | श्री. मार्तंड भैरव अध्यापक महाविद्यालय बालेवाडी, सर्व्हे नं-4243 स्टेट बँक ऑफ इंडिया, बालेवाडी ता. हवेली जि- पुणे | 9921184775<br>9307340357 |
| 5 | पुणे | 62474 | कोंडी राम सदाशिव क्षीरसागर कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, भिगवण. तालुका-इंदापूर. जिल्हा-पुणे. 413 105 | 9860116100<br>9011221111<br>9518513411 |
| 6 | सातारा | 6492A | आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज सातारा, 117 शुक्रवार पेठ सातारा, कोटेश्वर मंदिर रोड, राधिका टॉकीज चौक 413806 | 9422606177<br>9850510931 |
| 7 | पुणे | 62548 | डॉ.डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ एज्युकेशन, सर्व्हे नं- 175/A बेहिंद वाय सी एम हॉस्पीटल संत तुकाराम नगर पिंपरी, जि. पुणे 411018 | 9820908748 |
| 8 | सोलापूर | 6598A | उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय पंढरपूर पी.ओ.बॉक्स नं- 32 दत्ता नगर कऱ्हाड रोड, पंढरपूर जि- सोलापूर 413304 | 9820908748<br>9421040273<br>9860845730<br>8766520568 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | सोलापूर | 65155 | जय जगदंबा कॉलेज ऑफ एज्युकेशन, वैराग तालुका-बार्शी जिल्हा-सोलापूर - 413 402 | 9423717654<br>9595258416 |
| **कोल्हापूर** | | | | |
| 1 | कोल्हापूर | 7181A | महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक विद्यालय, शाहुपूरी, कोल्हापूर - 416001 | 9890875069<br>9892228045 |
| 2 | कोल्हापूर | 71171A | वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय कळंबा कोल्हापूर ८५३ विद्यावसंत पार्क, बापुरामनगर, कोल्हापूर | 0231-2322116<br>9822054148<br>9922770566<br>9822676800 |
| 3 | कोल्हापूर | 71174 | वाय.डी माने शिक्षणशास्त्र महाविद्यालय सांगावा रोड अलका शेती फार्म जवळ कागल जि-कोल्हापूर ४१६ २१६<br>bedkagul@gmail.com | 8983232707<br>9588437671<br>02325-245324 |
| 4 | सिंधुदूर्ग | 7445A | बॅ.नाथ पै.महिला बी.एड महाविद्यालय, कुडाळ जि.सिंधुदुर्ग | 9420822878<br>9423832705 |
| 5 | रत्नागिरी | 7301A | शासकिय अध्यापक महाविद्यालय,बोर्डिग रोड,रत्नागिरी-415612 | 9819300550<br>9975456268 |
| 6 | सांगली | 72126 | वैभव शिक्षणसंस्था कॉलेज ऑफ एज्युकेशन हनुमंतनगर विटा, ता. खानापूर जि.- सांगली पिन कोड 415311 | 9423036725<br>7020956476<br>9423326205 |
| 7 | सिंधुदुर्ग | 7463A | श्री. शां.कृ. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय, देवगड, ता.- देवगड, जि- सिंधुदुर्ग | 8975591601<br>9504497719 |
| 8 | सांगली | 7254A | श्रीमती पुतालाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन सांगली. राजवाडा चौक, ता.मिरज जिल्हा-सांगली 416416 | 7972751817<br>0233-2970178<br>9405547393 |
| **नांदेड** | | | | |
| 1 | अहमदनगर | 8434A | अभिनव अध्यापक महाविद्यालय एम.आय.डी.सी,प्लॉट क्र.43,बार्शी रोड लातूर | 9822108625<br>9421675118 |
| 2 | नंदूरबार | 8581A | सहयोग सेवाभावी संस्थेचे अध्यापक महाविद्यालय, विष्णुपूरी नांदेड – 431606 | 9503849648<br>904909292<br>9049092192 |
| 3 | परभणी | 8757A | श्री भैरवनाथ कॉलेज आफ एज्युकेशन ता. जि- परभणी | 9403003652<br>9175884590 |
| 4 | नांदेड | 85225 | राष्ट्रमाता शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिवाजी चौक सायाल रोड लोहा जि- नांदेड<br>४३१७०८ | 9423231195<br>9405383948 |

# ८. विभागीय केंद्रे

| क्र. | विभाग | संपर्कासाठी पत्ता | दूरध्वनी |
|---|---|---|---|
| १. | **अमरावती** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>अमरावती विभागीय केंद्र<br>व्ही. एम. व्ही.<br>ते वलगाव रोड,<br>पोस्ट व्ही. एम. व्ही.<br>अमरावती ४४४ ६०४ | (०७२१)<br>कार्या : २५३१४४५<br>फॅक्स : २५३१४४४ |
| २. | **औरंगाबाद** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>औरंगाबाद विभागीय केंद्र,<br>द्वारा : सर्व्हे नं. ४१, सैनिकी<br>मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस<br>नंदनवन कॉलनी, छावणी<br>औरंगाबाद ४३१ ००२ | (०२४०)<br>कार्या : २३७१०६६<br>फॅक्स : २३७१०८८ |
| ३. | **मुंबई** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>मुंबई विभागीय केंद्र<br>द्वारा : जगन्नाथ शंकरशेठ<br>म.न.पा.ची मराठी प्राथमिक शाळा<br>दुसरा मजला<br>फ्रेअर ब्रीज (साऊथ)<br>नाना चौक, ग्रँट रोड (प.)<br>मुंबई – ४०० ००७ | (०२२)<br>कार्या : २३८७४१८६<br>फॅक्स : २३८१३२५६ |
| ४. | **नागपूर** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नागपूर विभागीय केंद्र<br>रावबहादूर डी.<br>लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ<br>क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅम्पस<br>रविनगर चौक<br>नागपूर – ४४० ००१ | (०७१२)<br>कार्या : २५५३७२४<br>फॅक्स : २५५३७२५ |
| ५. | **नाशिक** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नाशिक विभागीय केंद्र,<br>महानगरपालिकेची जुनी इमारत<br>दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी<br>नाशिक ४२२ ००२ | (०२५३)<br>कार्या : २३१७०६३<br>फॅक्स : २५७६७५६ |
| ६. | **पुणे** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>पुणे विभागीय केंद्र<br>शाहीर अण्णाभाऊ साठे<br>प्रशालागृह, महानगरपालिकेची<br>शाळा क्र. ५ (मुलांची)<br>६५४, सदाशिव पेठ हौदासमोर<br>कुमठेकर मार्ग<br>पुणे ४११ ०३० | (०२०)<br>कार्या : २४४९११०७<br>फॅक्स : २४४५७९१४ |
| ७. | **कोल्हापूर** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>कोल्हापूर विभागीय केंद्र<br>शिवाजी विद्यापीठ परिसर<br>पोस्ट ऑफिसजवळ, विद्यानगर<br>कोल्हापूर ४१६ ००४ | (०२३१)<br>कार्या : २६०७०२२<br>फॅक्स : २६०७०२३ |
| ८. | **नांदेड** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नांदेड विभागीय केंद्र<br>द्वारा : स्वामी रामानंद तीर्थ<br>मराठवाडा विद्यापीठ<br>क्रीडा इमारत,<br>नांदेड ४२१ ६०६ | (०२४६२)<br>कार्या : २३६७१८<br>फॅक्स : २३६७१८ |

# ९. परिशिष्टे

**एम. ए. (शिक्षणशास्त्र) एम.एड. ला समकक्षतेबाबत**

राज्यातील खाजगी माध्यमिक शाळांतील शिक्षकांना
निवडश्रेणीसाठी अर्हता निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१५/(प्र.क्र.३१)/टीएनटी-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १५ जुलै, २०१६

**वाचा - शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक - पीआरई २००२/ ३३९५/ प्राशि-१ दि.२७.२.२००३**

**शासन शुध्दीपत्रक -**

राज्यातील खाजगी माध्यमिक शाळांतील शिक्षकांना निवडश्रेणी अर्हता निश्चित करण्याबाबत पारित करण्यात आलेल्या संदर्भाधीन शासन निर्णय, दि. १ डिसेंबर, १९९९ मधील खालील परिच्छेद - २

"इतर विषयांच्या शिक्षकांना "शिक्षकाच्या अध्यापनाच्या विषयाची पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम अर्हता" तसेच " ज्या अध्यापनाच्या विषयाची पदव्युत्तर पदवी बहिस्थ:रित्या संपादन करणे शक्य नसेल त्या ठिकाणी एम. एड. ही पदवी" ग्राहय धरण्यात यावी."

**या ऐवजी**

"शिक्षकाच्या शैक्षणिक अर्हतेबाबत इतर विषयाच्या शिक्षकांना "शिक्षकाच्या अध्यापनाच्या विषयाची पदव्युत्तर पदवी किंवा ज्या अध्यापनाच्या विषयाची पदव्युत्तर पदवी नियमितरित्या संपादन करणे शक्य नसल्यास त्या ठिकाणी बहिस्थ: रित्या प्राप्त केलेल्या त्या विषयातील पदव्युत्तर पदवी अथवा एम.एड. ही पदव्युत्तर पदवी ग्राह्य धरण्यात यावी," तसेच एम.ए. (एज्युकेशन) ही पदवी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद ( N.C.T.E. ) च्या दि. २८.११.२०१४ च्या अधिसूचनेनुसार एम.एड. पदवी समकक्ष समजण्यात यावी." असे वाचण्यात यावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७१६१५०६२१८४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2016.07.16 15:11:02 +05'30'

( राजेंद्र पवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

२) मा. मंत्री ( शालेय शिक्षण )